पुण्यश्लोक 300	M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education,Mumbai Divisional Board,Vashi, Navi Mumbai-400 703.		महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.

क्र. मुंविमं/यो.प्र./ ४६५६
वाशी ,नवी मुंबई ४००७०३
दिनांक:०९/१०/२०२६
१५

प्रति,
मुख्याध्यापक /प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
ठाणे/रायगड/पालघर/मुंबई(दक्षिण/उत्तर/पश्चिम)

विषय- योग्यता प्रमाणपत्राबाबत सूचना
संदर्भ-क्र.रा. मं./संशोधन/समकक्षता/४००९ दिनांक २८/०९/२०२६

उपरोक्त विषयास अनुसरून मुंबई विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यता प्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यायांना कळविण्यात येते की,

१. इ.११ वी मध्येच इतर मंडळातुन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव मंडळास सादर करुन योग्यता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करावी. जे विदयार्थी इ. १२ वी मध्ये आहेत व ज्यांचे योग्यता प्रमाणपत्राचे प्रस्ताव अद्याप पर्यंत सादर केलेले नाहीत, अश्या सर्व विद्यार्थ्यांचे प्रस्ताव मंडळास तात्काळ सादर करण्यात यावे.
२. ज्या विद्यार्थ्यांना इ. ११ वी मध्ये काही अपरिहार्य कारणामुळे योग्यता प्रमाणपत्र मिळाले नाही अथवा इतर मंडळातून विद्यार्थ्याने थेट इ. १२ वी मध्ये प्रवेश घेतला असेल अशा इ. १२ वी परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे योग्यताप्रमाणपत्राकरीता पाठपुरावा करावा व योग्यता प्रमाणपत्र इ. १२ वी चे आवेदनपत्र भरण्याच्या अंतिम दिनांकाच्या आत प्राप्त करुन घ्यावे.
३. जे विद्यार्थी मंडळाच्या समकक्षता यादीत नसलेल्या मंडळामार्फत इ. १० वी परीक्षा उत्तीर्ण असेल तर त्या विद्यार्थ्याच्या योग्यता प्रमाणपत्राकरीता मंडळ कार्यालयात समक्ष येवून दिनांक १५/१०/२०२६ पूर्वी प्रस्ताव सादर करावा.प्रस्तावा सोबत संबंधित मंडळाचे स्थापनेचे, त्या राज्याची मान्यता पत्र, इ.१० वी विषय योजना, विषय उत्तीर्णबाबतचे निकष तसेच विद्यार्थ्यांची १० गुणपत्रक,प्रमाणपत्र, स्थलांतर प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला या सर्व कागदपत्रांची प्रमाणित छायांकित प्रत जोडावी.
४. इ.१२ वी परीक्षेची आवेदन पत्र भरतांना योग्यता प्रमाणपत्र क्रमांक भरणेची अट असल्याने संबंधित विद्यार्थी आवेदन पत्र भरण्यापूर्वी योग्यता प्रमाणपत्र मिळविणे अनिवार्य आहे. योग्यता प्रमाणपत्रा अभावी विद्यार्थ्यांना आवेदन पत्र भरता आले नाही तर किंवा चुकीचे आवेदन पत्र सादर केले तर त्याची सर्वस्वी जबाबदारी कनिष्ठ महाविद्यालयाची / उच्च माध्यमिक शाळेची राहील त्यास मंडळ जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी. परीक्षेच्या ऐनवेळी विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र/समकक्षता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर होणार नाही तसेच एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(ज्योत्स्ना शिंदे –पवार)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४००७०३